# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०१/२०२५ (रविवार) दुपार**


---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद एकुण २,१९,०५,०००/— रू चा मुद्देमाल जप्त पोस्टे अरोली यांची धडक कारवाई

१) दिनांक १२/०१/२०२५ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, रामटेक तुमसर हायवे रोडवरून अडेगाव ते अरोली रोडनी अवैद्यरीत्या रेतीची वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता टाटा सिगना कंपनीचा टिप्पर ट्रक क्र. एम एच—४९/बी झेड— ३१३२ चा चालक **आरोपी नामे— शुभम गणेश मेश्राम, वय २८ वर्ष, रा. शिवाजी नगर कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर** याने त्याचे ताब्यातील टिप्परमध्ये मालकाचे सांगण्यावरून वाहनामध्ये परवान्यापेक्षा अधिकचे गौणखनिज रेतीची चोरी करून अवैध्य रेतीची वाहतूक करीत असतांनी मिळून आल्याने, आरोपीकडुन टिप्पर ट्रक क्र. एम एच—४९/बी झेड— ३१३२ किंमती ५५,००,०००/—रू व ट्रक मधील ११ ब्रास रेती किंमती ५५,०००/—रू. असा एकुण ५५,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर ट्रक चालक शुभम गणेश मेश्राम वय २८ वर्ष रा. शिवाजी नगर कन्हान तह पारशिवनी जि. नागपुर याने पाहिजे आरोपी नामे—सतीश किष्णाराव गायधने वय ४५ वर्षे रा. वाठोडा नागपुर याचे सांगन्यावरून तसेच वाहन मालक महिला आरोपी यांनी संगणमत करून सदर वाहनामध्ये रेती भरून अवैध वाहतूक करून सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान करून शासनाचा महसूल बुडविल्याने आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२),४९,३(५) बि.एन.एस, सहकलम ४८(७), ४८(८) म.ज.म. अधिनियम १९६६ अन्वये ४,२१ खाणी आणी खनिजे (विकास व नियमन) अधि. सहकलम ०३ सार्व. मालमत्तेचे नुकसान प्रति अधि अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

२) दिनांक १२/०१/२०२५ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असता अडेगाव शिवारातील अडेगाव ते शिवनी रोडवरील नहरजवळ पिवळया रंगाचा भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र. एम एच—४९/बी झेड— ४५४५ चा चालक **आरोपी नामे— किशोर विश्वनाथ कनोजे, वय ३२ वर्ष, रा. रविदास नगर येरखेडा कामठी** त्याचे ताब्यातील टिप्परमध्ये पाहीजे आरोपी सतीश किष्णराव गायधने, वय ४५ वर्ष, रा. वाठोडा नागपूर याचे सांगण्या वरून तसेच वाहन मालक महिला आरोपी यांनी संगणमत करून सदर वाहनामध्ये रेती भरून अवैद्य वाहतुक करीत असतांनी मिळून आल्याने, आरोपीकडुन पिवळया रंगाचा भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र. एम एच—४९/बी झेड— ४५४५ किंमती ५५,००,०००/—रू. व ट्रकमधील ११ ब्रास रेती किमती ५५,०००/—रू. असा एकुण ५५,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२),४९,३(५) बि.एन.एस, सहकलम ४८(७), ४८(८) म.ज.म. अधिनियम १९६६ अन्वये ४,२१ खाणी आणी खनिजे (विकास व नियमन) अधि. सहकलम ०३ सार्व. मालमत्तेचे नुकसान प्रति अधि अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

३) दिनांक १२/०१/२०२५ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असता सावंगी शिवारातील हनुमान मंदीरासमोर रोडवर भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का ट्रक क्र. एम एच ४९/ए टी ४५४५ चा चालक **आरोपी नामे— अमर मारोती कनोजे, वय ४७ वर्ष यशोधरा नगर येरखेडा कामठी** याने त्याचे ताब्यातील ट्रकमध्ये ट्रकमालक

नामे—सतिश क्रिष्णराव गायधने, वय ४५ वर्ष, रा. वाठोडा नागपूर याचे सांगण्या वरून वाहनामध्ये परवान्यापेक्षा अधिकचे गौणखनिज रेतीची चोरी करून अवैध्य रेतीची वाहतूक करीत असतांनी मिळून आल्याने, आरोपीचे ताब्यातून भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का ट्रक क्र. एम एच ४९/ए टी ४५४५ किंमती ५५,००,०००/—रू व ट्रकमधील ११ ब्रास रेती किमती ५५,०००/—रू असा एकुण ५५,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२),४९ बि.एन.एस, सहकलम ४८(७), ४८(८) म.ज.म. अधिनियम १९६६ अन्वये ४,२१ खाणी आणी खनिजे (विकास व नियमन) अधि. सहकलम ०३ सार्व. मालमत्तेचे नुकसान प्रति अधि अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

४) दिनांक १२/०१/२०२५ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असता रामटेक तुमसर हायवे रोडवरून अडेगाव ते अरोली रोडने अवैद्यरीत्या रेतीची वाहतुक करणारा भारत बेंझ कंपनीचा टीप्पर ट्रक क्र. एम एच—४९/ए टी—०९९० चा चालक **सागर अशोक उईके, वय ३१ वर्ष, रा. पाचगाव खैरी बिजेवाडा रामटेक** याने त्याचे ताब्यातील ट्रकमध्ये ट्रकमालक नामे— सतिश क्रिष्णराव गायधने, वय ४५ वर्ष याचे सांगण्या वरून वाहनामध्ये परवान्यापेक्षा अधिक चे गौणगणिज रेतीची चोरी करून अवैध्य रेतीची वाहतूक करीत असतांनी मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातून भारत बेंझ कंपनीचा टीप्पर ट्रक क्र. एम एच—४९/ए टी—०९९० किंमती ५२,००,०००/—रू ०८ ब्रास रेती ४०,०००/—रू असा एकुण ५२,४०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२),४९ बि.एन. एस, सहकलम ४८(७), ४८(८) म.ज.म. अधिनियम १९६६ अन्वये ४,२१ खाणी आणी खनिजे (विकास व नियमन) अधि. सहकलम ०३ सार्व. मालमत्तेचे नुकसान प्रति अधि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर